Vol II Issue X July 2013

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Osmar Siena
Brazil

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

*Review Of Research*
Vol.2, Issue. 10, July. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# *ज्ञानयोगी शिवाजीराव भोसले यांच्या चरित्रलेखनाचे स्वरूप व 'शैली : एक अभ्यास*

*कमलाकर कोंडिबा राऊत*

'ज्ञानसागर', नेताजी कॉलनी, अंबाजोगाई , जि. बीड.

***सारांशः***

मराठी साहित्यात चरित्रलेखनाला उज्ज्वल अशी परंपरा आहे. राष्ट्रीय नेते, महापुरुष, समाजसुधारक, विचारवंत धर्मसंस्थापक, शिक्षणतज्ज्ञ, क्रांतिकारक, साहित्यिक, कलावंत इत्यादिंची चरित्रे लिहिली व वाचली जातात. प्रत्येक पिढीच्या जडणघडणीसाठी अशी चरित्रे उपयुक्त ठरतात. 'जगावे कशासाठी आणि मरावे कशासाठी' याचे भान उगवत्या पिढीला अशा चरित्रांतून 'दीपस्तंभ' समोर उभे राहतात,

### *प्रास्ताविक :*

'देशोदेशीचे दार्शनिक' जीवनाचे तत्त्वज्ञान समजावून सांगतात, असामान्यांची प्रतिभा व अपार कर्तृत्व पाहून नव'प्रेरणा' मिळते; तेव्हा असे उत्तम चरित्रग्रंथ लिहिणारे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्यासमोर नतमस्तक व्हावेसे वाटते. वाचनापासून दूर चाललेल्या युवा पिढीमध्ये वाचनाची व चरित्रवाचनाची अभिरुची वृद्धिंगत करण्याचे आणि त्यांच्या जीवनविकासासाठी यथायोग्य मार्गदर्शन व प्रेरणा देण्याचे कार्य भोसले सरांच्या चरित्रलेखनामुळे घडले आहे.

### *चरित्रपर ग्रंथसंपदा :*

भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, साहित्य, धर्म, यांसोबतच महापुरुषांचे, तत्त्वज्ञांचे, समाजसुधारकांचे जीवनचरित्र व विचारधारा अभ्यासणे हा भोसले सरांचा मूळचा पिंड. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडीत नेहरू, संत गाडगेबाबा, सानेगुरुजी, डॉ. राधाकृष्णन, विनोबा भावे इत्यादी महापुरुशांची भाषणे सरांनी जवळून अनुभवली. सोनोपंत दांडेकरांचे ते विद्यार्थी राहिले. भारावलेल्या या काळात व्यासंगातून, महापुरुषांच्या दर्शन–मार्गदर्शनातून सरांची जडणघडण होत गेली. सरांच्या वक्तृत्त्वाला धुमारे फुटत गेले. लेखणी लिहिती झाली. अनेक उत्तमोत्तम ग्रंथ रसिकवाचकांसमोर येत गेले.

भोसले सरांनी एकूण 10 मौलिक ग्रंथांचे लेखन केले असून त्यांपैकी 4 ग्रंथ हे चरित्रग्रंथ आहेत. चरित्राच्या प्रांतात हे ग्रंथ आदर्शवत समजले जातात. 1993 साली दै.'सकाळ'च्या पुरवणीमधून जेव्हा सरांचे 'दीपस्तंभ' हे सदर सुरू झाले. तेव्हा असंख्य वाचक अक्षरशः 'सकाळ' होण्याची व 'सकाळ' येण्याची वाट पाहत होते. 1994 साली 'दीपस्तंभ' ग्रंथरूपाने साकार झाले.

प्रस्तुत ग्रंथात सरांनी 47 राष्ट्रीय नेते, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, विचारवंत यांच्या जीवनचरित्रांचा वेध साधारणतः 8 ते 10 पानांमध्ये प्रभावीपणे घेतला आहे. नवभारताचा आद्यप्रबोधनकार : राजाराममोहन रॉय यांच्यापासून ते देदीप्यमान पंतप्रधान : लालबहादूर शास्त्री' असा हा 'प्रकाशाची वाट' दाखविणारा प्रवास आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस इत्यादी राष्ट्रीय नेते, ईश्वरचंद्र विद्यासागर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, इत्यादी समाजसुधारक, रवींद्रनाथ टागोर, सानेगुरुजी इत्यादी साहित्यिक, प्रफुल्लचंद्र रे, विश्वेश्वरय्या इत्यादी शास्त्रज्ञ, जे.कृष्णमूर्ती, डॉ. राधाकृष्णन इत्यादी विचारवंत व अन्य कर्मयोगी, प्रतिभावंत यांच्या जीवनकार्याचा, जडणघडणीचा व प्रभावाचा घेतलेला वेध विचारगर्भ, भावपूर्ण व परिणामकारक ठरला आहे.

'मुक्तिगाथा महामानवाची' हा महायोगी श्री अरविंद यांच्या चरित्राचा व तत्त्वज्ञानाचा वेध घेणारा ग्रंथ सरांनी लिहिला असून 'दीपस्तंभ' या ग्रंथाच्या पूर्वी तो वाचकांसमोर आला आहे. श्री अरविंद, रामकृष्ण, परमहंस, स्वामी विवेकानंद ही सरांची वैचारिक दृष्टीने आराध्य दैवते होती. अनेकदा सर श्री अरविंदांच्या आश्रमात राहून, तेथील विचारचिंतन अनुभवून आले आहेत. प्रस्तुत ग्रंथारंभी योगी, तत्त्वज्ञ श्रीअरविंद हे 'इहलोकीचे नवल' आहे असे सरांनी म्हटले आहे. या ग्रंथात एकूण 9 प्रकरणे आहेत. बीज अंकुरले, प्राध्यापक, साधक व संपादक, राष्ट्रदेवो भव, वेदपुरीची विचारगुंफा, तेथे आदिशक्ती विराजते, हे तो प्रचीतीचे बोलणे, प्रमेयांचे उद्यान, मी आहे जगज्जीवनी निरंतर, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, अशा स्वरूपात श्रीअरविंदांचे जीवनादर्शन व विचारदर्शन सरांनी सारग्राही व सहजसुंदर लेखनशैलीत घडविले आहे. ग्रंथाच्या शेवटी इसवीसनानुसार अरविंदांचा संक्षिप्त जीवनपट दिला आहे.

2005 साली प्रकाशित झालेल्या 'प्रेरणा' या ग्रंथात सरांनी विविध क्षेत्रांत होऊन गेलेल्या कर्तृत्त्ववान, असामान्य व्यक्तींच्या जीवनकार्याचा वेध घेतला आहे. 'महान वक्ता डेमॉस्थेनिस' पासून ते 'कलाप्रेमी देशसेविका : कमलादेवी चट्टोपाध्याय' पर्यंतच्या प्रवासात विविध क्षेत्रांतील कर्तृत्त्ववान, असामान्य व्यक्तींचे जीवनकार्य, ध्येयनिष्ठा, तत्त्वनिष्ठा प्रभावित करून जाते. स्वामी विवेकानंद, अब्राहम लिंकन, मॉटेसरी, वि.स.खांडेकर, अहल्याबाई होळकर, जोसेफ मॉझिनी, कर्मवीर भाऊराव पाटील, भगतसिंग, सयाजीराव गायकवाड, इत्यादी 48 कर्तृत्ववान व्यक्तींची, असामान्यांची चरित्रे नितांतसुंदर व प्रेरणादायी ठरली आहेत.

**Title:** *ज्ञानयोगी शिवाजीराव भोसले यांच्या चरित्रलेखनाचे स्वरूप व 'शैली : एक अभ्यास*
**Source:Review of Research [2249-894X]** *कमलाकर कोंडिबा राऊत* **yr:2013 vol:2 iss:10**

'देशोदेशीचे दार्शनिक' या 2005 साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात, भारतात व अन्य देशांत होऊन गेलेले विचारवंत, तत्त्वज्ञ, धर्मसंस्थापक, योगी, दार्शनिक यांच्या विचारप्रणालीचा, तत्वज्ञानाचा सरांनी परामर्श घेतला आहे. 'दर्शने व दार्शनिक', 'जागतिक विचारश्रीमंती', 'जीव, जगत आणि जगन्नाथ' या तीन प्रकरणांत सरांनी मानवी जीवनातील विचारांची, विवेकाची मौलिकता स्पष्ट केली आहे. त्यानंतर 'चार्वाक दर्शनां'पासून ते 'मनोविश्लेषक सिग्मंड फ्रॉईड' पर्यंत देशोदेशीच्या दार्शनिकांच्या मूलगामी विचारधारेचे व तत्त्वज्ञानाचे चिंतनप्रवर्तक व विलोभनीय दर्शन घडते. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, गौतम बुद्ध, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बसवेश्वर, कन्फ्यूशस, कान्ट, नानकदेव आदी जगभरातील 40 दार्शनिकांचे विचार दर्शन एका ग्रंथात सलग व सुबोध भाशेत अनुभवताना जीवनजाणिवा समृद्ध होत जातात व नवी जीवनदृष्टी लाभते.

### *चरित्रलेखनामागील भूमिका :*

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या लेखनामागील भूमिका विषद केली आहे. 'दीपस्तंभ' या ग्रंथाच्या लेखनामागील भूमिका सरांनी 'चरित्रवनातील माझी आनंदयात्रा' या मनोगतात प्रतिपादन केली आहे :

''चरित्राची चव चाखली तर त्याची गोडी वाटेल, गोडी वाटली तर अभ्यास करावासा वाटेल. अभ्यासामुळे चरित्र आत्मसात होईल. मग त्याचा एखादा अंश आपल्या अंगी बाणेल.... विस्तृत चरित्रे परवडणार नाहीत आणि संक्षिप्त चरित्रे मिळणार नाहीत. अशा स्थितीत या देशाचा इतिहास ज्यांच्या हातून घडणार आहे अशा युवकांसाठी आणि युवतींसाठी आपण काही करू शकतो का ?असा विचार मनात आला आणि हे घडले. हे चरित्रलेखन की चरित्रचिंतन हे वाचकांनी ठरवावे.''[1]

सरांची 'दीपस्तंभ' या ग्रंथाप्रमाणेच 'प्रेरणा' या ग्रंथाच्या लेखनामागे ही भूमिका होती. सर हे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व आदर्श प्राचार्य राहिले होते. उगवत्या व उभरत्या पिढीचे ते शिल्पकार ठरले होते. विद्यार्थ्यांची उत्तम जडणघडण व्हावी, युवाशक्ती समाज व राष्ट्राच्या कार्यासाठी सार्थकी लागावी ही त्यांची धारणा होती. त्यानुसार त्यांनी वाणी, लेखणी व कृती सार्थकी लावली होती.

'प्रेरणा' या चरित्रग्रंथाच्या लेखनामागील भूमिका विषद करताना सरांनी 'प्रेरणेमागची प्रेरणा' या मनोगतात म्हटले आहेः ''मुलांच्या डोळयांपुढे विविध क्षेत्रांतील पराक्रमाची शिखरे दिसली तर त्यांना त्या दिशेने धाव घेण्याची बुद्धी होईल. 'प्रेरणा' हे अशा शिखरांचे दर्शन आहे. ही शिखरे दिसली तर ती मुलांना खुणावतील, साद घालतील. मग मुले मनाशी म्हणतील, 'आपण त्या दिशेने का न जावे' मुलांनी हे म्हणावे आणि त्या दिशेने धावत राहावे हीच माझ्यासारख्या शिक्षकाची इच्छा''[2]

'देशोदेशीचे दार्शनिक' ही एक भावपूर्ण विचारप्रदक्षिणा असून ही जीवनभाश्ये अभ्यासली तर आपले व्यक्तिगत जीवन, विचार सुंदर होईल, असे सरांनी म्हटले आहे. 'मुक्तिगाथा महामानवाची' हा ग्रंथ श्री अरविंदांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने दिलेल्या व्याख्यानांतून साकार झाला आहे. 'इहलोकीचे नवल' ठरलेल्या अरविंदांचे अलौकिक व स्फूर्तिप्रद चरित्र सर्वांना ज्ञात व्हावे, ही सरांची प्रेरणा असल्याचे दिसून येते.

यावरून सरांची चरित्रलेखनामागील, विद्यार्थ्यांच्या, युवकांच्या जीवन विकासाची, मानवाच्या कल्याणाची भूमिका व अपेक्षा असल्याचे दिसून येते.

### *चरित्रलेखनाचे स्वरूप :*

भोसले सरांचे चरित्रलेखनाचे एक विशिष्ट स्वरूप व शैली आहे. त्यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथांचा अभ्यास केला असता त्यांच्या चरित्रलेखनाचे स्वरूप व शैली पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

### *1) उत्कंठावर्धक प्रारंभ :*

भोसले सर 'चरित्रलेखांचे लक्षवेधी, उत्कंठावर्धक व मर्मग्राही प्रास्ताविक करतात. त्यांच्या लेखाची सुरुवात वाचकाच्या मनाची लागलीच पकड घेते अन् तो उत्सुकतेने, जिज्ञासेने वाचला जातो :

उदा. : ' दीपस्तंभ या ग्रंथात देदीप्यमान पंतप्रधान लालबाहादूर शास्त्री' या चरित्रलेखाचा प्रारंभ खालीलप्रमाणे केला आहे :

'' अनेकांची अशी दृढ समजूत आहे की, तत्त्वनिष्ठ माणसे राजकारणात पडत नाहीत; पडलीच तर ती यशस्वी होत नाहीत; यशस्वी झाली तर ती तत्त्वनिष्ठ राहत नाहीत.... या समजुतींना छेद देणारे काही दाखले इतिहासाच्या दप्तरी आढळतात. कोणत्याही गावात ज्यांच्या मालकीचे घर नव्हते ते लालबहादूर शास्त्री भारताचे पंतप्रधान झाले. सर्व ऋतूंत अंगरक्षण करणारा एकच कोट शास्त्रींकडे होता. त्यांची पत्नी पतिराजांच्या फाटक्या कुडत्यापासून ब्लाऊज शिवत असे. विरल्या धोतराचे सोगे सांधून घरकामापुरते वस्त्र ती तयार करीत असे. रेशनची साखर संपली तर मुलांना साखरेशिवाय दूध पाजत असे. इतिहासाला अजरता आणि संस्कृतीला अमरता प्राप्त होते, ती अशा दिव्य जीवनामुळे ! ''[3]

अशा रीतीने चरित्रलेखांचा प्रारंभ केलेला दिसून येतो.

### *2) पार्श्वभूमीकथन :*

सर चरित्रलेखांच्या प्रारंभी वा लेखात, प्रस्तुत चरित्रनायकाने ज्या पार्श्वभूमीवर कार्य केले, ती पार्श्वभूमी विशद करतात अथवा जी पार्श्वभूमी चरित्रनायकाच्या कार्यासाठी प्रेरक ठरली ती पार्श्वभूमी कथन करतात.

श्री. म.माटे हे ब्राह्मण समाजातील पुरोगामी विचारसरणीचे, दलितांच्या उद्धाराचे कार्य करणारे निष्ठावंत कार्यकर्ते व साहित्यिक होते. दलितांविषयीच्या त्यांच्या आत्मीयतेचे मूळ त्यांच्या पूर्वजीवनात होते. याबाबत सरांनी ती पार्श्वभूमी 'प्रेरणा' या ग्रंथातील 'समाजशिक्षक प्रा. श्री.म.माटे' या लेखात चित्रीत केली आहे :

''ते शिंगणापूर, विटे, रेणावी अशा लहान गावांत राहिले होते. त्यांनी कातकऱ्यांची पाले पाहिली होती. मडकी थापटणारे कुंभार, दोरखंड वळणारे मांग, सनई वाजविणारे कैकाडी पाहिले होते. शेतकऱ्यांचा मोटनाडा त्यांनी हाताळला होता. धोब्यांची गाढवेसुद्धा वळली, वळवली होती. खेड्यापाड्यातील ही अठरापगड प्रजा त्यांना आपली वाटत होती. त्यांच्यासाठी जगणे हा त्यांचा कर्तव्याचा भाग वाटत होता. या वाटण्याला पुढे जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे रूप प्राप्त झाले.''[4]

अशारीतीने चरित्रनायकाच्या कार्यास प्रेरक ठरलेली पार्श्वभूमी चित्रित केल्याचे दिसून येते.

पंडित नेहरू यांचे आडनाव 'नेहरू' हे कसे पडले, याचा पूर्वसंदर्भ सरांनी 'दीपस्तंभ' या ग्रंथातील 'ऋतुराज जवाहरलाल नेहरू' या लेखात नोंदविला आहे. ''पंडित नेहरूंचे एक पूर्वज राज कौल यांचे निवासस्थान आणि शेतीवाडी एका कालव्याकाठी होती. कालव्यास 'नहर' हा

प्रतिशब्द आहे. या नहरवरून 'नेहरू' हे नाव अस्तित्वात आले''5, असे सरांनी म्हटले आहे.

### *3) भूमिकेचे सोदाहरण विवेचन :*

चरित्रनायक, असामान्य व्यक्ती एका विशिष्ट भूमिकेतून जगत असतात. त्या भूमिकेसाठी, स्वीकृत तत्त्वासाठीच खरे तर ते जगत असतात. सरांनी चरित्रलेख लिहिताना जाणीवपूर्वक चरित्रनायकाची जीवनधारणा, स्वीकृत भूमिका, तत्त्व यांविषयी सोदाहरण विवेचन केले आहे.

उदा : 'प्रेरणा' या ग्रंथातील 'समाजशिक्षक श्री. म.माटे' या लेखात श्री. म. माटे यांची भूमिका खालीलप्रमाणे प्रतिपादन केली आहे :

'' बापूसाहेबांना जीवनातील सर्व काळ सामान्य स्थितीत राहावे लागले, याची अनेकांना खंत होती. बापूसाहेबांना मात्रे ती नव्हती. ते म्हणत, ' आपल्या मताचा आग्रह सोडणे व दुसऱ्यांचे मत आपले म्हणून सांगत सुटणे, अशी भलती किंमत देऊन जगणे व्यर्थ आहे. माझा मी स्वमतानुसार जगलो.''[6]

अशा रीतीने चरित्रनायकाच्या स्वीकृत तत्त्वाचे भूमिकेचे सोदाहरण विवेचन केल्याचे दिसून येते.

### *4) प्रभाव प्रतिपादन :*

कोणत्याही सामान्य व असामान्य व्यक्तीच्या जडणघडणीवर कोणाचा तरी प्रभाव पडलेला असतो. प्रभाव, संस्कार, प्रेरणा यांतून व्यक्तिमत्त्व आकारास येत असते. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वावर ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा प्रभाव पडला आहे, तो प्रभाव सरांनी प्रभावीपणे प्रतिपादन केला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांना युवावस्थेत श्री अरविंदांचे भाशण देशकार्यासाठी प्रभावित व प्रेरित करून गेले, तसेच एका साधूचा संदेशही या कार्याला बळकटी देणारा ठरला. 'प्रेरणा' या ग्रंथातील 'जय हिंद ! जय सुभाष !!' या लेखात सरांनी हा प्रभाव नोंदविला आहे :

''आयुष्यात अकरा वेळा कारागृहवास अनुभवणाऱ्या सुभाषचंद्रांना काही काळ श्री अरविंदांचे एक भाषण वारंवार आठवे. श्री अरविंद बंगाली युवकांना म्हणाले होते : '' तुमच्यापैकी काही जणांनी मातृभूमीला मोठे करण्यासाठी मोठे व्हावे. आपल्या सर्वस्वाचा नैवेद्य या देवतेला दाखवावा'' वयाच्या सतराव्या वर्षी गुरूंच्या शोधार्थ गिरिकंदरात भटकणाऱ्या सुभाषबाबूंना एका साधूने सांगितले : '' आकाश हेच घरकुल समज धरती शय्या समज. मिळेल तो घास गोड करून घे. चालत रहा. खूप मोठा होशील तू.''[7]

देशबंधू चित्तरंजन दास हे सुभाषचंद्रांचे गुरू मार्गदर्शक व स्फूर्तिदाते असल्याचेही सरांनी प्रतिपादन केले आहे.

### *5) कार्यकर्तृत्वाची नोंद :*

चरित्रनायकाचे कार्यकर्तृत्व ठळकपणाने व सारग्राही स्वरूपात चरित्रलेखांमध्ये नोंदविले आहे. वाचक लेख वाचताना हे तेजस्वी कार्यकर्तृत्व लगोलग वाचताना भारावून जातो. महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे यांचे कार्यकर्तृत्व 'प्रेरणा' या ग्रंथातील 'महाराष्ट्रपुरुष विनायक लक्ष्मण भावे' या लेखात नेमकेपणाने व समर्पक शब्दांत टिपले आहे :

''भावे यांचा महाराष्ट्र सारस्वत हा ग्रंथ मराठी भाषेच्या अभ्यासकांना सदैव मार्गदर्शक ठरेल. हे शुद्ध साहित्य संशोधन प्रथम प्रा. विजापूरकर यांच्या 'ग्रंथमाला' या मासिकातून प्रसिद्ध होत गेले. आरंभीचे शंभर पृश्ठांचे निबंधवजा टाचण पुढे एकाविस्तृत ग्रंथात परिणत झाले डॉ. तुळपुळे यांनी त्याची मौलिकता व मार्गदर्शनक्षमता विचारात घेऊन एक पुरवणी खंड त्याला जोडला. या ग्रंथात मराठी भाषेच्या मूळ पीठिकेपासून पेशवाईच्या अखेरी–पर्यंतचा म्हणजे 1818 पर्यंतचा मराठी साहित्याचा इतिहास भावे यांनी आपल्या रसमधुर शैलीत लिहिला आहे. त्यांनी 'तुकारामाची अस्सलगाथा' दोन खंडात संपादीत केली आहे.जयराम स्वामींचा 'अपरोक्षानुभव' त्यांनीच प्रकाशात आणला....''[8]

अशा रीतीने चरित्रनायकाचे कार्यकर्तृत्व ठळकपणाने व समर्पक शब्दांत नोंदविल्याचे दिसून येते.

### *6) कार्यकर्तृत्वाचे मोल :*

चरित्रनायकाच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेतल्यावर सर त्या कार्यकर्तृत्वाचे महत्त्व, मोल स्पष्ट करतात. त्यामुळे जिज्ञासू वाचकांना प्रस्तुत चरित्रनायकाच्या कार्यकर्तृत्वाचे मोल समजते. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे व अनाथ बालिका, विधवांच्या पुनर्वसनाचे मोलाचे कार्य केले. कर्व्यांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेचेच रूपांतर एस.एन.डी.टी. विद्यापीठात झाले असून स्त्री शिक्षणाचा सर्वदूर प्रसार व प्रचार करण्याचे आणि हजारो विद्यार्थीनींचे जीवन समर्थपणे घडविण्याचे महत्कार्य या विद्यापीठाने केले आहे. कर्व्यांच्या कार्यकर्तृत्वाचे मोल 'दीपस्तंभ' या ग्रंथातील 'स्त्री–मुक्तिदाता धोंडो केशव कर्वे' या लेखात सरांनी समर्पक शब्दांत प्रतिपादन केले आहे :

'' अण्णा गेले. पण मागे एक स्त्री–शक्तिपीठ ठेवून गेले. मातृत्वाचा गौरव करणाऱ्या भारतीयांना अखिल स्त्रीजीवनाचा गौरव करणारा व्यापक धर्म त्यांनी शिकवला. या थोर स्त्रीशक्ती उपासकाने हिंगण्याच्या माळावर घोर तपश्चरण केले. त्याच्या तपातून एक स्त्रीशक्तिपीठ अस्तित्वात आले. स्त्री या शक्तीची जीवनात प्राणप्रतिश्ठा करण्याचे पुण्यकर्म या पुरुषोत्तमाने केले.''[9]

### *7) गुणवैशिष्ट्याांचे सोदाहरण प्रतिपादन :*

प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात काही गुणवैशिष्ट्यो असतात. असामान्य कर्तृत्ववान व्यक्तींच्या ठायी अशी गुणवैशिष्ट्यये प्रकर्शाने दिसून येतात. ध्येयनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा, जिद्द, चिकाटी, साहस, सहनशीलता, इत्यादी गुणवैशिष्टयांच्या बळावर अशा व्यक्ती असामान्य, मौलिक कार्य करून जातात. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे सारस्वत व विचारवंत होते. महाराष्ट्रीय ज्ञानकोश ( 1 ते 23 खंड ), हिंदुस्थान आणि जग, वेदविद्या, बुद्धपूर्व जग अशा अनेक खंडात्मक मौलिक ग्रंथांचे लेखन प्रकाशन आणि 'ब्राह्मण कन्या', 'आशावादी' अशा महत्वपूर्ण कादंबऱ्यांचे लेखन डॉ. केतकरांनी महत्प्रयासाने केले आहे. त्यांची अंगभूत कार्यनिष्ठा, चिकाटी 'प्रेरणा' या ग्रंथातील 'ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर केतकर' या लेखात नोंदविली आहे :

'' 1919 ते 1927 या काळात महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे 1 ते 23 खंड केतकरांनी प्रसिद्ध केले. या कामी त्यांनी अनेकांना सहकार्याचे आवाहन केले; पण त्यांना ते लाभू शकले नाही. शेवटी त्यांनी संपादन विभागातील कार्यकर्त्यांना हाताशी धरले, शिकवले, ऐकवले, जाणते केले व त्यांच्या संघटित सहकार्याने हे अघटित कार्य सिद्धीस नेले.''[10]

अशा रीतीने चरित्रनायकाच्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांचे सोदाहरण विवेचन केल्याचे दिसून येते.

### *8) विचारांची मांडणी :*

राष्ट्रीय नेते, असामान्य कर्तृत्ववान व्यक्ती, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, विचारवंत, साहित्यिक हे समाजाच्या, देशाच्या, जगाच्या कल्याणाचे काही विचार मांडत असतात. अनेक ग्रंथांच्या अभ्यासचिंतनातून, अनुभवातून स्फुरलेल्या या विचारांतून पुढील कार्यासाठी प्रेरणा मिळत असते. म्हणून चरित्रलेखनात सरांनी चरित्रचिंतन तर केलेच आहे, त्याबरोबरच चरित्रनायकाचे चिंतन ही मांडले आहे. हे चिंतन सकळांसाठी चिंतनप्रवर्तक ठरते. मानवी जीवनाचा, जगाचा ढासळलेला तोल सावरण्यासाठी महात्मा गांधीजींनी मांडलेले विचार 'देशोदेशीचे दार्शनिक' या ग्रंथातील 'महात्मा गांधी' या लेखात नोंदविले आहेत :

''जगाचा व जीवनाचा ढळलेला तोल सावरण्यासाठी गांधीजी एक व्यापक 'संवादतत्त्व' सांगतात. हा संवाद हाच मानवाच्या मुक्तीचा व मोक्षाचा मार्ग होय. हा संवाद तीन स्तरांवर घडावयास हवा. माणसाची बुद्धी, भावना व कार्यक्षमता यात संवाद निर्माण झाला पाहिजे. माणसामाणसांत पण संवाद नांदावा. कलह, संघर्ष, युद्ध यांचे निराकरण या संवादामुळे घडेल. त्याचप्रमाणे माणूस आणि निसर्ग यात संवाद असावा. जीवन हे स्वाभाविक व निसर्गाशी समन्वय साधणारे, तादात्म्य अनुभवणारे असावे. पर्यावरणाचे रक्षण हा संस्कृतीचा प्राण होय.''[11]

चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा पिंड ज्यातून दिसून येईल आणि मानवी जीवनास उपकारक, मार्गदर्शक ठरतील असे विचार चरित्रलेखात नोंदविल्याचे दिसून येते. 'देशोदेशीचे दार्शनिक' या ग्रंथात मात्र देशोदेशीच्या दार्शनिकांची विचारधारा, तत्त्वज्ञान स्पष्ट करणारे वैचारिक विवेचन अधिक प्रमाणात केले आहे. काही विचार मूळस्वरूपात उद्धृतही केले आहेत.

### *9) संदेश प्रतिपादन :*

महापुरुष राष्ट्रीय नेते हे आपल्या जीवनातून काहीतरी संदेश देऊन जातात. 'मेरा जीवनही मेरा संदेश है' असे गांधीजी म्हणत. चरित्रलेखांचे वाचन चालू असताना लेखाच्या शेवटी महापुरुषांनी, राष्ट्रीय नेत्यांनी दिलेला संदेश अंतःकरणाला स्पर्श करून जातो. 'दीपस्तंभ' या ग्रंथातील 'संस्कारभूषण सानेगुरुजी' या लेखात गुरुजींनी या जगाचा निरोप घेण्यापूर्वी शेवटच्या पत्रात लिहिलेला संदेश उद्धृत केला आहे :

'' अखेरचा भक्तिप्रेमाचा व कृतज्ञतेचा संदेश की, लोकशाही, सत्याग्रही समाज हे ध्येय धरा. ते तारील. अजातीय व अहिंसक लोकशाही व सत्यागृही दृष्टी घ्या. भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो. व्यक्तिस्वातंत्र्यासह समाजवाद फुलो. पूज्य विनोबांचे स्मरण.''[12]

हे स्वप्न पाहण्यासाठी सानेगुरुजी आयुष्यभर कार्य करीत गेले होते. परंतु देशभरातील जातीयता, भ्रष्टाचार, अनाचार पाहून ते अस्वस्थ होत गेले. हे जग आपल्यासाठी राहिले नाही हे त्यांना वाटत राहिले. त्यातूनच त्यांनी या जगाचा निरोप घेतला होता. म्हणून कोणतेही महापुरुष, राष्ट्रीय नेते, विचारवंत, साहित्यिक, तत्त्वज्ञ असो, त्यांचे कार्यकर्तृत्व व विचार यांचा वेध घेताना त्यांनी दिलेला अखेरचा संदेशही तितकाच मोलाचा ठरतो. म्हणूनच अनेक चरित्रलेखांमध्ये असे संदेश उद्धृत केल्याचे दिसून येते.

### *10) प्रेरणादायी व चिंतनप्रवर्तक समारोप :*

चरित्रलेखाचा समारोप वाचकाच्या मनात उतरलेल्या भावजाणिवांना चेतना देऊन जाणारा असावा लागतो. तो भावपूर्ण व हृदयस्पर्शी तर असावाच, पण चिंतनप्रवर्तकही असावा लागतो. सरांनी लिहिलेल्या चरित्रलेखांचा शेवट हा अगदी असाच असल्याचा जाणवतो. पंडिता रमाबाई यांनी 'शारदासदन' व 'स्त्रीमुक्ती सदन' चालवून स्त्रियांच्या उद्धाराचे मोलाचे कार्य केले. 'प्रेरणा' या ग्रंथातील 'क्रियाशील पंडिता पंडिता रमाबाई' या लेखाचा समोराप वाचून डोळ्यांत अश्रू उभे राहतात :

'' स्त्रियांची आसवे पुसणाऱ्या या देवतेचे चित्र नियतीने 5 एप्रिल 1922 या दिवशी पुसून टाकले. काही महिने अगोदरमनोरमा देवाघरी गेली. मागोमाग तिची मायही गेली. त्या दिवशी मुक्तिसदनावर येशूची आसवे ओघळली.''[13]

अशा रीतीने चरित्रलेखांचा भावपूर्ण, हृदयस्पर्शी व चिंतनप्रवर्तक समारोप केल्याचा दिसून येतो.

यावरून सरांच्या चरित्रलेखनाचे स्वरूप व शैली सारांशरूपाने पुढीलप्रमाणे दिसून येते. चरित्रलेखाचा प्रारंभ हा मर्मग्राही व उत्कंठावर्धक, चरित्रनायकाच्या कार्यामागील वा कार्यास प्रेरक अशी पार्श्वभूमी, विचारांचा व व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव, जडणघडण, विविध घटना—प्रसंग यांची यथोचित गुंफण, कार्यकर्तृत्व व विचारांची मांडणी, त्यांचे मोल, चरित्रनायकाचा संदेश, प्रेरणादायी समारोप, अशा रीतीने साधारणतः सरांनी चरित्रलेखन केल्याचे दिसून येते. चरित्रलेखनाची ओघवती भाशा, मुद्देसूद विवेचन, नेटकी मांडणी, सारग्राही व सहजसुंदर लेखनशैलीचा प्रत्यय प्रस्तुत चरित्रलेखन वाचताना येतो.

### *चरित्रलेखनाचे महत्त्व :*

सध्याची पिढी वाचनापासून दूर जात असताना त्यांच्यात वाचनाची अभिरूची निर्माण करून ती वृद्धिंगत करण्याचे आणि त्यांच्या जीवनजाणिवा समृद्ध करण्याचे मोलाचे कार्य सरांच्या वृत्तपत्रांतील चरित्रलेखनाने, चरित्रग्रंथांनी केले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, स्पर्धा परीक्षेचे व संशोधक विद्यार्थी यांच्यासह सर्व स्तरांतील वाचकांना हे ग्रंथ वाचनीय उपयुक्त, मार्गदर्शक व प्रेरक ठरले आहेत.

'' आम्हां विद्यार्थीमित्रांना शालेय जीवनात वक्तृत्व, निबंध स्पर्धेसाठी उपयुक्त ठरलेले भोसले सरांचे चरित्रग्रंथ आता महाविद्यालयीन जीवनात सर्व दृष्टीने मार्गदर्शक व प्रेरक ठरत आहेत. 'दीपस्तंभ', 'प्रेरणा' 'देशोदशीचे दार्शनिक' व 'मुक्तिगाथा महामानवाची' हे चार ग्रंथ म्हणजे ज्ञान, संस्कार, संस्कृती, विवेक व प्रेरणा यांचे अमोघ भांडार वाटतात.आपले जीवन घडविणारे हे 'दीपस्तंभ' 'प्रकाशाची वाट' दाखवीत नित्य 'प्रेरणा' देत राहतील.''[14]

असे प्रतिपादन अक्षय रूद्राक्ष, विनोद केंद्रे, रवी मुंडे या विद्यार्थ्यांनी मुलाखतीप्रसंगी केले.

प्रत्येक पिढी ही आदर्शाच्या शोधात असते. असे आदर्श या ग्रंथांमध्ये सामावलेले आहेत. प्रस्तुत ग्रंथ येणाऱ्या पिढ्यांसाठी नित्य उपकारक व मार्गदर्शक ठरत राहतील.

यावरून प्रस्तुत चरित्रलेखनाचे अनन्यसाधारण महत्त्व दिसून येते.

### *समारोप :*

भोसले सरांनी, अनेक महापुरुष, राष्ट्रीय नेते, समाजसुधारक, विचारवंत, तत्त्वज्ञ, साहित्यिक यांना जवळून पाहिले, ऐकले व अनुभवले आहे. महापुरुष व विविध क्षेत्रांतील असामान्य कर्तृत्ववान व्यक्ती यांचे जीवनचरित्र अभ्यासणे हा सरांचा नित्य ध्यासाचा व चिकित्सक अभ्यासाचा

विषय राहिला आहे. यातून साकार झालेल्या या ग्रंथांचे म्हणूनच अधिक मोल आहे.

प्रस्तुत चरित्रग्रंथांतील चरित्रनायकांच्या जीवनचरित्रांचा प्रदीर्घ काळ निष्ठापूर्वक केलेला चिकित्सक व सूक्ष्म अभ्यास, चरित्रलेखनाची विशिष्ट शैली, समर्पक शीर्षक, ओघवती व सुबोध भाषा, मुद्देसूद विवेचन, नेटकी मांडणी, सारग्राही व सहजसुंदर लेखनशैली, युवा पिढीच्या कल्याणाची आत्यंतिक तळमळ यांतून साकार झालेले प्रस्तुत ग्रंथ हे ज्ञानवर्धक, संस्कारक्षम, जीवनजाणिवा समृद्ध करणारे, मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले आहेत.

*निष्कर्ष :*

1.प्रस्तुत चरित्रग्रंथांतून चरित्रनायकाचे जीवनचरित्र व विचार यांचा सारग्राही वेध घेतल्याचे दिसून येते.
2.प्रस्तुत चरित्रलेखनात उत्कंठावर्धक प्रारंभ, प्रतिकूल वा प्रेरक पार्श्वभूमी, विचारांचा व व्यक्तिमत्त्वांचा चरित्रनायकांवरील प्रभाव, त्यातून झालेली जडणघडण प्रत्ययकारी स्वरूपात चित्रीत केल्याचे दिसून येते.
3.प्रस्तुत चरित्रलेखनात विविध प्रसंग–घटना यांची यथोचित गुंफण केल्याचे आणि चरित्रनायकांच्या कार्यकर्तृत्वाचा व विचारांचा परामर्श घेत त्यांचे मोल स्पष्ट केल्याचे दिसून येते.
4.प्रस्तुत चरित्रलेखनात अनेक चरित्रनायकांनी दिलेला संदेश नोंदविल्याचे आणि प्रेरणादायी समारोप केल्याचे दिसून येते.
5.प्रस्तुत चरित्रलेखनात ओघवती व सुबोध भाषा, नेटकी मांडणी व सहजसुंदर लेखन शैली असल्याचे दिसून येते.
6.प्रस्तुत चरित्रग्रंथ हे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी,संशोधक विद्यार्थी व स्पर्धा परीक्षेचेविद्यार्थी तसेच सर्व स्तरांतील वाचक यांच्यासाठी वाचनीय, उपयुक्त, मार्गदर्शक व प्रेरक ठरले असून ते चिरंतन उपकारक ठरतील असे दिसून येते.

*संदर्भग्रंथ :*


1.प्राचार्य भोसले शिवाजीराव, दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,पाचवी आवृत्ती,फेब्रुवारी 2003, पृ.क्र.10,11.
2.प्राचार्य भोसले शिवाजीराव, प्रेरणा, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी 2007, पृ.क्र. 5.
3.प्राचार्य भोसले शिवाजीराव,दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,पाचवी आवृत्ती,फेब्रुवारी 2003,पृ.क्र. 425.
4.प्राचार्य भोसले शिवाजीराव, प्रेरणा, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी 2007,पृ.क्र. 61.
5.प्राचार्य भोसले शिवाजीराव, दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,पाचवी आवृत्ती,फेब्रुवारी 2003, पृ.क्र. 349.
6.प्राचार्य भोसले शिवाजीराव, प्रेरणा, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी 2007, पृ.क्र. 63.
7.तत्रैव, पृ.क्र. 5.
8.तत्रैव,पृ.क्र. 58,59.
9.प्राचार्य भोसले शिवाजीराव, दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,पाचवी आवृत्ती,फेब्रुवारी 2003, पृ.क्र. 135.
10.प्राचार्य भोसले शिवाजीराव, प्रेरणा, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी 2007, पृ.क्र. 95.
11.प्राचार्य भोसले शिवाजीराव,देशोदेशीचे दार्शनिक, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती, मे 2006, पृ.क्र. 93.
12.प्राचार्य भोसले शिवाजीराव, दीपस्तंभ, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,पाचवी आवृत्ती,फेब्रुवारी 2003, पृ.क्र. 404.
13.प्राचार्य भोसले शिवाजीराव, प्रेरणा, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी 2007, पृ.क्र. 68.
14.रूद्राक्ष अक्षय, केंद्रे विनोद, मुंडे रवी यांची मुलाखत, अंबाजोगाई, दि. 10 फेब्रुवारी 2013.
15.प्राचार्य भोसले शिवाजीराव, मुक्तिगाथा महामानवाची, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट 2005.
16.प्राचार्य भोसले शिवाजीराव, जीवनवेध, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती, मे 2011.
17.प्राचार्य भोसले शिवाजीराव, हितगोष्टी, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, एप्रिल 2004.
18.प्राचार्य भोसले शिवाजीराव, जागर (खंड 1), अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे,सप्टेंबर 2002.
19.प्राचार्य भोसले शिवाजीराव, जागर (खंड 2), अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, फेब्रुवारी 2003.
20.प्राचार्य भोसले शिवाजीराव, कथा वक्तृत्वाची, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, ऑक्टोंबर 2003.
21.प्राचार्य भोसले शिवाजीराव,यक्षप्रश्न, अक्षरब्रह्म प्रकाशन,पुणे, फेब्रुवारी 1998.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net